# उपसंहार प्रकरण ४

पुराणे, महापुराणे, उपपुराणे, रामायण, महाभारतादि महाकाव्य ही "समाज", "राष्ट्र" या कल्पनेशी व्यक्ति किंवा व्यक्तिसमूह कसे तादात्म्य पावलेले असतात ते महाकाव्याचा अभ्यास केल्यानंतर पटते. - (१)

धर्म, वंश, भाषा, इतिहास, परंपरा, विद्या, कला, राज्यसंस्था, समाजसंस्था, व्यक्तिगत आणि सामाजिक विकासाची जीवन पध्दति या सर्व घटकांचा विचार पुराणात येतो, पुराणातील महापुरुषाव्दारे, ग्रंथाव्दारे वरील घटक समाजपुरूषाच्या जीवनक्षेत्रात प्रवेश करत असतात.

माझ्या या लघुशोध प्रबंधात आदिकाळातील आदिपुराण, म्हणजे प्रथम तीर्थंकर ऋषभनाथ, भरत, बाहुबली यांच्या चरित्रांचा त्यांच्या मुलामुलींच्या जीवनात सखोलपणे डोकावुन पाहिले आहे. ऋषभनाथाच्या काळात म्हणजेच संपलेला भोगभुमीचा काळ, पण मोठी कठीण परिस्थिती निर्माण झाली होती, म्हणूनच ऋ षभनाथांनी असि, मषि, कृषी, विद्या, वाणिज्य, शिल्प या षट्विद्येचे सखोल ज्ञान देऊ न लोकांना जगण्याच्या साधनाचे कथन केले.

जगण्याची केवळ कलाच सांगितली नाही तर, गाव, खेडी, नगर रचना यांच्या निर्मितीकडे बारकाईने लक्ष दिलेले होते. स्थानिक प्रशासनात शांतता, सुव्यवस्था निर्माण व्हावी म्हणून दुर्गुनांसाठी दंडसंहिता देखील अंमलात आणली.

पुराणकाला पासून चालत आलेली कुटुंबपध्दती, सामाजिक परिस्थिती, बोलण्या चालण्याच्या पध्दती, भाषा, शिक्षण पध्दती आजही थोडयाफार फरकाने अस्तित्वात असल्याचे दिसून येते. एखादया व्यक्तिला वर्तमानकाळात जगताना भूतकाळ उकलून पाहण्याची उत्सुकता असते. पुराणातील कथाबद्दल कुतुहल वाटते, त्यातुन सध्याच्या जीवनाशी सांगड घालण्याचा तो सतत प्रयत्न करत असतो. सध्याच्या भोगविलासापेक्षा पुराणातील त्यागविलास अधिक चांगला वाटतो. -

ऋषभनाथाच्या जीवनाला कलाटणी देणारा प्रसंग म्हणजे, नृत्यांगना निरांजनेचा अचानक मृत्यु हा होय. या प्रसंगानी राजा राजाही राहिला नाही व रंकही राहिला नाही तर राजा मात्र केवल ज्ञानी झाला, अध्यात्मिक झाला.

राजा भरताने षट्खंड जिंकुन चक्रवर्ती पद मिळविले. राहिलेल्या ब्राम्हण वर्गाची निर्मिती करून बुध्दीप्रामाण्याला अधिक महत्व दिले. अनेक राजे, महाराजे, भरताच्या अंकित होते, बंधु-बाहुबली तेव्हढा अधिपत्याखाली नव्हता तरी देखील भरतालाही चक्रवर्ती पद सोडून वानप्रस्थाश्रमाचा मार्ग स्विकारावासा वाटला.

वरील कथानकावरून आदिपुराणात शृंगार, वैभवाचे वर्णन असले तरी त्याचा त्याग केल्याशिवाय मुक्ती मार्ग प्रशस्त होत नाही हा जैन धर्माचा मुळ सिध्दांत याची प्रचिती यात येते. - (२)

ऐहिक आणि पारमार्थिक यांची तोंडमिळवण म्हणजे आदिपुराण आहे. जैन संस्कृती ही मृत्युंजय आहे हे उठावदारपणे सांगणे हे या महाकाव्याचे विशेष आहे. भगवान श्रीकृष्णाने गितेमार्फत भारतीय संस्कृतीला जी बहुमोल देणगी दिली तिला अनेक वर्षापासून बहुजन समाज आपला अमोल निदि म्हणून जोपासत आहे. हिंदू धर्मातील धार्मिक व दार्शनिक विचारांना त्यामुळे बळ मिळाले. अशाच पध्दतीचा आदिपुराण हा ग्रंथ आहे. - (३)

विश्वात आणि मानवी जीवनात कालतत्वे भरले आहे. जग अतितीव्र वेगाने बदलत असते, हे बदलणे अखंडपणे चालू असते. जीवनात उत्कर्ष व अवनती सातत्याने चालती. उन्नती, अवनती या दोन्हीही सापेक्ष आहेत. ज्याकाळात हे विश्व अवनतीकडून उन्नतीकडे धावू लागते त्यास उत्सर्पिणी काल म्हणतात. ज्या काळात उन्नतीकडून अवनतीकडे वाटचाल करते त्यास अवसर्पिणी काल म्हणतात. उत्सर्पिणी काळात मानवाचे ज्ञान, आयुष्य, शक्ती वगैरे क्रमाने वाढत जातात आणि अवसर्पिणी काळात ते कमी कमी होत जातात. काळाचे सहा भेद मागे दिलेलेच आहेत. एका विभागाला "समा" म्हणतात. हे काळ म्हणजे जीवनात सुखा नंतर दुःख किंवा दुःखानंतर सुख, असेच सामान्य भाषेत म्हणावे लागेल आणि अगदी तंतोतंत विचार करावयाचा तर कृष्णपक्षा नंतर शुक्लपक्ष तद्वत कालतत्व असते. आदिपुराणातील हे काळाचे तत्व जीवनाचे तत्वच सांगते म्हटले तरी फारसे वावगे नाही. - (४)

पुराणाची निर्मिती करणारे महापुरूष असतात मग ते महापुराण असो की, रामायण, महाभारत असो. जैन आचार्यानीच जैन साहित्याची निर्मिती व वृध्दी केली. आचार्य, प्रसिध्दी पासून दूर असतात, ३६ गुणानी युक्त असतात. भगवंताच्या दिव्यध्वनीतून निघालेली दिक्कालातील असणारी, विज्ञानाच्या कसाला उतरणारी, मार्गदर्शक महान तत्वे, सामान्यापर्यंत पोचविण्याचे काम आचार्यांनी केले. पुष्पदंत, भूतबली, वीरसेन, कुंदकुंद, उमास्वामी, समंतभद, पूज्यपाद, अमृतचंद्रसूरि, जिनसेन, यापेक्षाही अनेक आचार्य होऊन गेले. -

आदिपुराण हे संस्कृतपुराण, पुराणसाहित्यात तीसरा क्रमांक लागतो. या पुराणात ४७ पर्व असून ४२ पर्व पूर्ण व ४३ व्या पर्वातील ३ श्लोक जिनसेनाचार्याने लिहिलेली आहेत. उर्वरित ४७ पर्व पूर्ण होई पर्यंत त्यांचे शिष्य गुणभद्राचार्यांनी लिखान केले आहे. यात प्रथम तीर्थकर ऋषभनाथ व त्यांचे प्रथम पुत्र चक्रवर्ती भरत यांचे अख्यान विस्तृत प्रमाणात लिहीले आहेत.

आदिपुराणाच्या पहिल्या पर्वातील गाथा ६९, ७०, ७१ मध्ये कवी - महाकवी, गुरू शिष्य संबंध दाखविले आहेत.

कुल परंपरेच्या बाबतीत विचार केला तर वंश दोन प्रकारचे असतात असा उल्लेख केला आहे. १) लौकिक वंश, २) पारमार्थिक वंश.

लौकिक वंशाचा संबंध योनीबरोबर असतो तर पारमार्थिक वंश विद्येबरोबर असतो. पारमार्थिक वंशाचे नाते विरसेनाबरोबर जोडणारे श्रेष्ठ विद्वान महाकवीने कवी व महाकवीचे तुलनात्मक स्पष्टीकरण दिले आहे.

जे आपल्या वाणीव्दारा धर्मकथांची रचना करतात त्यामुळे मिथ्यादृष्टी नष्ट होते अशांना जिनसेनाचार्य महाकवी म्हणतात. त्यांना ते नमस्कार करतात, सज्जन पुरूषाकडून तयार केलेली काव्य अलंकार सहित शृंगारादि रसांनी युक्त, सौंदर्यानेयुक्त असणारी काव्ये सरस्वतीच्या मुखासारखे शोभायमन दिसतात.

जे प्राचीन काळाशी संबंधीत आहे, ज्यात तीर्थंकर, चक्रवर्ती पुरूषाचे चरित्र चित्रण केले, जे धर्म, अर्थ, कर्माचे फळ दाखविणारे असते त्याला महाकाव्य म्हणतात. पूर्वपरंपरेचा संबंध ठेवून श्लोकांची रचना करणे कठीण असते. गुरू शिष्य परंपरेचा विशाल प्रवाह वाहत आहे असे महाकवी समुद्रा समान आचरण करतात.

कवि कोणाला म्हणायचे ? याबद्दल मिथ्यादृष्टी असणा-यांना ज्याच्या कवीता मनोहर वाटतात, ज्याचे काव्य अधर्मानुबंधी असते, शृंगारादि रसाने भरलेले काव्य असते, अन्य कविव्दारा, रचलेले शब्द, केवळ शब्द अर्थात थोडेसे परिवर्तन करतात. ज्याच्या कविता शब्दाने सुंदर परंतु अर्थाने शुन्य असतात, ज्याचे काव्य सज्जन पुरूषांना आनंदी करण्यास समर्थ नसतात, ते कवी, कवी होत, कहाकवि नाहीत.



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

जे कवि कविताव्दारा कपिल, चार्वाक यांच्या मताचा पुरस्कार करतात, मिथ्यामार्गाचा प्रचार करतात, अशा कविंना जिनसनाचार्य "कुकवि" म्हणतात. - (६)

आदिपुराणात आचार्य जिनसेनाने कवि, महाकवि, काव्य, महाकाव्य, गुरू शिष्य संबंधा विषयी पहिल्या पर्वात सविस्तर माहिती दिली आहे.

ऋषभदेवाच्या पूर्वभवाच्या कथा सांगण्याचा हेतू असा असावा की, पूनर्जन्माचा आश्रय घेऊन माणूस शुध्द भाव, शुभ भावाने वरवर चढत जाऊन केवळ सृष्टीकरताच होत नाही तर तीर्थकर पदापर्यंत जाऊन भव्य जीवांना उपदेश कर्ताहि होतो. हे कथानकाचे वैशिष्टयपूर्ण उद्दीष्ट लक्षात आल्यावाचून राहत नाही. नराचा नारायण झाला, वाल्याचा वाल्मिकी झला तशीच प्रचिती अनेक पुराणाव्दारे येते.

संतोषवृत्ती, समाधानी वृती ठेवल्याने त्याचे फळ देखील गोडच मिळतात अशी म्हण आहे. महाराज नाभीच्या देखील संतोषरूपी वृक्षाला अतिशय गोड फळे आली. प्रभात समयी, कमलिनीना विकसित करणारे तेजस्वी सूर्यास जशी पूर्व दिशा जन्म देते तद्‌वत चैत्रकृष्ण नवमिच्या दिवशी सूर्योदयाच्या वेळी उत्तराषाढा नक्षत्र असताना मरूदेवीनी एका तेजस्वी पुत्राला जन्म दिला. - (७)

ऋषभदेवाच्या जन्माआधि म्हणजेच "गर्भाधान" या संस्काराचे अतिशय मनोहर, वैभवशाली वर्णन आदिपुराणात आहे. इंद्रानी

ऋषभदेवाच्या जन्मापुर्वी आयोध्या नगरीची रचना कशी केली याचेही पुरेपुर वर्णन यात आहे. अर्थात हे वर्णन कल्पनामय असले तरी गर्भाधान संस्कारा पासून संस्कार किती महत्वाचे आहेत. अजुबाजूच्या वातावरणाचा परिणाम मातेला आंनदी ठेवण्यासाठीचे केलेले वर्णन त्यामागची दूरदृष्टी जाणवल्याशिवाय राहत नाही.

ऋषभदेवाच्या जन्माआधी सहा महिने शुभ मुहूर्त पाहून देव अयोध्या नगरीत प्रवेश करतात. यावरून तत्कालात ग्रह नक्षत्र ता-यांचाही अभ्यास होता याची कल्पना येते. अयोध्या नगरीवर कुबेराने केलेली रत्नवृष्टी हे अतिशयोक्तीचे वर्णन अनेक ठिकाणी आदिपुराणात येत असले तरी, काल्पनीकतेकडून वास्तवतेकडे जाण्याची जिनसेनाचार्याची काव्य शैली अजरामर झाली.

ऋषभदेवाची माता मरूदेवीला गर्भावस्थेत पडलेले स्वप्न यावरून आगमामध्ये स्वप्ने याला महत्व आहे असे दिसते. तीर्थकराच्या मातेला स्वप्न पडणे तेही १६ स्वप्ने पडणे त्यातही स्वप्नांच्या लक्षणावरून पुत्ररत्नाची चाहूल लागणे या अजब गोष्टी पुराणातून वाचायला मिळतात. तीर्थकराच्या आगमनाची चाहुल स्पष्ट दाखविली आहे.

आदिपुराणातील १३ व्या पर्वात जन्माभिषेक सोहळा वर्णन करताना तीर्थकर बालकाला हातोहात इन्द्रायणीने पाण्डुकवनातील पाण्डुकशीलेवर बसलिे तिथे अनेक देव देवतांनी जल व दुग्ध अभिषेकाने बालकाला

सूचीभूत केले. यावेळी देवदेवतात उत्साहाचे उधान आले. अभिषेकानंतर प्रक्षालन करून चंदनादि गंधाचा शिडकावा करून, बालकावर पुष्पवृष्टी करत, मंगल वाध्याच्या कलरवात नृत्य करून परत बालकास मरूदेवीच्या स्वाधीन करताना तीर्थकराचा नामविधी सोहळा करण्यास देव देवता विसरल्या नाहीत. हे वर्णन काल्पनीक वाटत असले तरी, तीर्थकराच्या जन्माची ही लक्षणे होत.

भगवान ऋषभदेव स्वभावत: वीतरावी होते. ऋषभनाथाची बाल्यअवस्था पाहून नाभीराय व मरूदेवी कृतकृत्य होत होते. तारूण्य अवस्थेत आदिनाथ आले असता पिता नाभीराय व ऋषभदेव यांच्यातील झालेले आदिपुराणातील संभाषण वाचल्यानंतर आदर्श गृहजिवनाची प्रचिती येते. नाभीराय ऋषभदेवाला म्हणतात, मी निमित्त मात्र पिता आहे तुम्ही स्वयंभू आहात, आदिपुरूष आहात, धर्माची संतती वाढावी म्हणून तुम्ही इष्ट कन्येबरोबर विवाह करावा. हे ऐकुण त्यांच्या वचनाचा स्विकार करून ऋषभनाथ विवाह करतात. पिता पुत्र यांचे नाते, एकमेकांना दिलेला आदर आजच्या समाजाला, पित्याला, मुलाला हा एक आदर्शच आहे. कुटुंबसंस्थेत कुटुंबातील सदस्याचे शिष्टाचार आदिपुराण सांगून जातात.

आदिपुराणातील १५ व्या पर्वातील ७३ व्या श्लोकात ऋषभनाथाचा विवाह यशस्वती व सुनंदा यांच्या बरोबर होत असताना मरूदेवीला झालेला आनंद व्यक्त केलेला आहे. कोणत्याही आईला आपल्या मुलाच्या

लग्नाविषयी हर्ष वाटतच असतो. ही आईची मानसिक स्थितीची झलकही दिसून येते. ऋषभनाथ व यशस्वतीला जो बालक झाला त्याचे नांव भरत ठेवले. नातू जन्मलेला पाहून मरूदेवी, नाभीराय अत्यंत प्रसन्न झाले. येथेही आजी, आजोबा झाल्यानंतरचा आनंद व्यक्त केलेला आहे. ऋषभदेवाचे पुत्र भरत, बाहुबली व ब्रम्ही व सुंदरी या कन्या, तसेच इतर मुले मिळून १०१ मुले होती. त्यांचे सर्वांगसुंदर रूप मोठे दर्शनिय होते. त्यात तेजस्वी भरत सूर्य होता, संदर बाहुबली चंद्रमा होते. इतर मुले ग्रह, नक्षत्र, तारांगण होते. आपल्या मुलांना निरनिराळया विद्येत पारंगत करणा-या ऋषभदेवानी मुलींनाही शिक्षण देणे महत्वाचे मानले.

अर्थात तत्कालीन समाजातील शिक्षण पध्दती, शिक्षणाचे विषय, शिक्षणाचे टप्पे या विषयीची माहिती मिळते.

चातुर्वर्ण्य हे हिंदू धर्माचे वैशिष्टये म्हणून सांगण्यात येत असले तरी चातुर्वर्ण्य उत्पत्तीची प्रक्रिया जैन मुनींनी जैन धर्माची आहे हे स्पष्ट केले आहे. श्री ऋषभदेवांनी तीन वर्णाची स्थापना केली आणि भरतानी ब्राम्हण वर्णाची स्थापना केली. याचाच अर्थ वर्णोत्पत्तीच्या मागची पार्श्वभूमी पाहता समाजात व्यक्तिपरत्वे, कामे नेमून शांतता निर्माण करणे हे गरजेचे होते.

राजा-राजपद :- आदिपुराण कालात ऋषभदेव पहिले राजे होते. त्यांनी इश्वाकूभूमि (अयोध्या) येथे राज्य केले. त्या आगोदर कोठेही राज्य नव्हते,

राजा नव्हता, शासन नव्हते व शासन कर्ताही नव्हता. ही अशा प्रकारची स्थिती होती की, सर्व लोक निसर्ग धर्माचे पालन करून सदाचाराच्या साहयाने आनंदपूर्वक जीवन व्यतीत करीत होते. परिणामी शासन, शास्ता कोणाचीही गरज नव्हती. मात्र तिस-या काळाच्या शेवटी यतिगण धर्मभ्रष्ट झाले, कल्पवृक्षाचा प्रभाव कमी झाला, अराजकता वाढली म्हणून नाभीरायाच्या विनंती वरून ऋषभनाथांनी असि, मसि, कृषी, विद्या, वाणिज्य, शिल्प या कलांचा जगण्यासाठी उपदेश केला, शासनसंस्थेची निर्मिती केली. राजपदाची कथा वैदिक ग्रंथात येते ती कथा म्हणजे देव, दानवाची कथा होय.

शासन संस्थेची सुरूवात कशी झाली कोण कोणत्या गोष्टींचा त्यात समावेश होता याची माहिती आदिपुराणातुन मिळते.

जैन आगमात दंड नितीचे हक्कार, मक्कार, चिक्कार असे प्रकार सांगितले आहेत. ऋषभदेवाच्या काळात क्रोध पूर्वक बोलणे, स्थानबध्द करणे हे शिक्षा प्रकार सुरू झाले. तर त्यांचा पुत्र भरताने तुरूंगवास व अवयव च्छेदन शिक्षांची सुरुवात केली.

प्रजापालनासाठी राजा प्रजेचे कल्याण करणारा निर्व्यसनी असावा. राजेपद वंश परंपरागत होते. राजाला अनेक मुले असल्यास मात्र सत्तेसाठी संघर्ष होत असे. ऋषभनाथाचे पुत्र भरत व बाहुबली यांच्यात दृष्टीयुध्द,


BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

जलयुध्द, मुष्टीयुध्द झाल्याचा उल्लेख येतो. लक्षावधी सैन्याची हिंसा टाळण्यासाठीच अशी युध्दे केली. - (८)

राजाचे कार्य - निःपक्षपणे दृष्टांचा नाश करणे हे राजाचे प्रमुख कर्तव्य हाते. राजाचे न्यायालय सर्वश्रेष्ट न्यायालय होते. लोक कल्याणकारी कार्य करणे, मंत्रीमंडळाच्या नेमणुका करणे, वारस ठरविणे इ. कार्य होते. राजाला सहकार्य करणारे युवराज, अमात्य, श्रेष्टी, पुरोहित यांना अनन्य महत्व होते. मंत्र्याच्या सहकार्यावर राज्याचा विकास, उन्नती व स्वामित्व निर्भर होते. राजासाठी धार्मिक कृत्य करण्याचे काम मंत्री पुरोहित करत असे.

अशा त-हेने शासन व्यवस्थेतील राजाची कर्तव्य, त्याचे गुण, राजाचे सल्लागार, अधिकारी तसेच राजपद कोणाला दयावे याचीही माहिती त्यामधून मिळते. न्याय व्यवस्थेची तत्वे कोणती, न्याय कसा दिला जात होता, याचीही माहिती मिळते. मंत्री मंडळाची रचना, त्याची कामे याची चर्चा आदिपुराणात केलेली आढळते. राजाचा मुख्य सल्लागार पुरोहित असे. जेव्हा भरत, बाहुबली यांच्यात संघर्ष होत होता तेव्हा हिंसा टाळण्याचा सल्ला भरताला पुराहितांनेच दिला या उदाहरणावरून पुरोहित सल्लागार होता हे स्पष्ट होते.

प्राचिन काळी हस्तियुध्द, अश्वयुध्द, मुष्टियुध्द, बाहुयुध्द, रथयुध्द, जलयध्द हे युध्द प्रकार होते.

ऋषभनाथांनी मार्गदर्शन केल्याप्रमाणे लोक असि, मसि, कृषी, विद्येव्दारे आर्थिक समृध्दता आली. परिणामी विद्येच्या व्यासंगाबरोबर कलेला प्राधान्य दिले गेले. या कलेची प्रचिती आदिपुराणातील सोळाव्या पर्वातून ४१ व्या गाथेपासून ६२ व्या गाथेपर्यंत येते.

दागदागिण्यांच्या कलेचे वर्णन अधिक रोचक वाटते, ऋषभदेवांनी त्यांच्या मुलांना यष्टी, हार, रत्नावली, मोती, रत्नांनी बनविलेले सुंदर दागिणे, तत्कालीन अभुषणाचे विविध प्रकार त्यात आहेत. त्या अभुषणांची नांवे, मणी कमी जास्त करून तयार केलेले कंठ, हार त्याचे विविध नावे वाचून भारतात कला कुसरीच्या दागिण्याची निर्मिती होत असल्या कारणानेच बाहेर देशात त्याला मागणी होत असे याची कल्पना येते. दाग दागिण्यांचे प्रकार, विवाह सोहळा याचे वर्णन वाचल्यानंतर तत्कालीन, आर्थिक समृध्दतेची माहिती मिळते.

जिनसेनाचार्यानी आदिपुराणातील प्रत्येक घटक, वस्तु, नगर, खेडी रचना यांचा बारकाईने अभ्यास करून महाकाव्याची रचना म्हणजे ऋषभनाथाच्या जीवनातील प्रसंग चित्रपटासारखे डोळयासमोर तरलतात. ही प्रसंग वर्णने खेडी, नगर रचना वर्णने, विवाह सोहथळा वर्णने हे वाचून खरोखरचे हेआदिपुराणे म्हणजे "अमोल रत्न" आहे याची प्रचिती येते.

तत्कालिन समाज कसा होता, त्याचे राहणीमान कसे होते, ते कशा प्रकारच्या घरात रहात होते, कोणते अलंकार घालत होते याचे दर्शन त्यामधून घडते. एका समृध्द समाजाचे चित्र डोळयासमोर उभे राहते.

असि, मसि, कृषी, विद्या, वाणिज्य, शिल्प, ही षट्कर्म ऋषभदेवानी लोकांना शिकविली. इक्षुच्या ऊसाच्या उत्पादनाकडे व त्याच्या रसाचा उपयोग करण्याकडे अधिक लक्ष दिले त्यामुळे त्यांना "इश्वाकू" असे म्हटले जाऊ लागले. याच नावाने त्यांचा वंश प्रसिध्दीला आला.

त्यांना काहीजण प्रजापति म्हणत होते तर काहीजण त्यांना ब्रम्हा म्हणत असत. हिरण्यगर्भ या नावाने देखील ते ओळखले जात कारण ते गर्भात येताच सोन्याची वृष्टी झाली होती. - (९)

वंशाची निर्मिती हि राजाच्या कर्तुत्वावर होती. जसे कर्मावरून वर्णाची उत्पत्ती तसेच कर्मावरून वंशही ठरविला जातो हे दिसून येते. अशी उदाहरणे इतिहासात अनेक आहेत. चंद्रगुप्त मौर्य राजा पराक्रमी होता. मौर्य का म्हणत तर त्याचे पुर्वज मोर पाळत होते किंवा तो मुरा नावाच्या दासी पासून झाला म्हणून मौर्य नांव पडले अशी उत्पत्ती मौर्य घराण्याच्या नावाबद्दल सांगितली जाते.

ऋषभनाथांनी ऊस उत्पादनाकडे अधिक लक्ष दिले हे वाचून मी सध्याच्या परिस्थितीचा विचार केला तर इतिहासाची पुनरावृत्ती होते त्यात तथ्य आहे. कारण आजही ऊसाच्या उत्पादनाकडे अधिक लक्ष दिलेले आहे.

म्हणजेच आजच्या संस्कृतीची पाळेमुळे पहावयाला मिळतात. ऊस हे नगदी पिक आहे म्हणजेच तत्कालीन लोक धान्याबरोबरचं नगदी पिकाचे उत्पन्न घेत होते असे दिसते.

जीवनात एखादा प्रसंग जीवनाची उद्दीष्टे सांगून जातो त्याप्रमाणे ऋषभनाथच्या जीवनातील एक प्रसंग म्हणजे निलांजनाचा नृत्य करतानाचा झालेला मृत्यु होय. विलास, भोगोपभोग, वैभव क्षणीक आहेत, विनाशी आहेत, अलंकार भाररूप आहेत, चंदनाचा लेप म्हणजेच संसार सुख क्षणीक आहे, नृत्य केवळ वेडया मनुष्याच्या क्रिया, गीत, संसारातील करूण अवस्थेचे रूंदन होय हे विचार मनात येताच आदिनाथ विरक्त झाले.

भगवान ऋषभदेव राजत्याग करून तपश्चकरण करण्या करिता वनात जातील म्हणून शिल्पकारांनी एकीकडे पालखी बनविली तर दुस-या बाजूस भरतेश्वराला राज्याभिषेकासाठी भव्य मंडप बनविला. हे वर्णन म्हणजे संसरातील सुख दु:ख होय. पण दोन्ही प्रसंगाकडे पाहण्याचा प्रत्येकाचा दृष्टीकोन वेगवेगळा असतो कारण यात शाश्वत सुख व ऐहिक सुख यापैकी खरे सुख कोणते ? हे प्रत्येकाच्या विचारावर असते.

ऋषभदेवाचा वानप्रस्थाश्रम सुरू झाला तर भरताचा ग्रहस्थश्रम चालू होता अर्थात या आश्रम पध्दती म्हणजे जीवनाचे मार्ग आहेत.

ऋषभनाथांनी राजा म्हणून भरतावर तर बाहुबलीस युवराज पदाची जबाबदारी सोपविली. दोघेही तुल्यबलच होते पण जेष्ट पुत्रालाच सत्ता

मिळत असते हे यातून दिसते. युवराज म्हणून राजघराण्यातील लोकांचीच नियुक्ती होत असते हे दिसते.

ऋषभदेवांनी सिध्दाच्या साक्षीने परिग्रहाचा त्याग केला, पूर्व दिशेला मुख करून पद्मासन घालून विराजमान झाले व पाच मुठीनी मस्तकावरील केस हाताने काढून टाकून दिले म्हणजेच केशलोच करून कायोत्सर्ग धारण करून ते मानसिक, वाचनिक आणि कायिक विकारावर ताबा मिळवून आत्मध्यानात लिन झाले. त्यांची ध्यानस्थ अवस्था पाहून त्यांच्याबरोबर ज्या राजांनी दीक्षा घेतली होती त्यांचे धैर्य ढळू लागले पण भगवंतांनी आत्म्यावर विजय मिळविला. स्वभावतःच ते तेजपुंज होते. ध्यानधारणेने अधिकच दैदिप्यमान दिसू लागले. हे वर्णन आदिपुराणात १७ व्या अध्यायात २१६ व्या गाथेपासून २२२ व्या गाथेपर्यंत दिले आहे.

सहा महिन्यानंतर महाराजांना ख-या ज्ञानाची प्राप्ती झाली ते विहार करू लागले पण आहार घेतला नाही कारण आहार कसा दयावा हे लोकांना माहीत नव्हते. परिणामी सहा महिने आणखी आहार न घेता रहावे लागले. तपश्चर्येचे सहा महिने व आहार न मिळालेले सहा महिने हा गेलेला काळ लक्षात घेतल्यास पुद्‌गल म्हणजे शरीर व आत्मा यातील भेदज्ञान असल्या कारणाने त्यांना भूक, तहान लागल नाही. जेव्हा ऋषभदेव विहार करीत हस्तिनापूरला आले त्यावेळी तेथे सोमप्रभा राजा राज्य करीत होता. त्याचा लहान बंधू श्रेयांस होते हा पूर्व जन्मात धनदेव शेठ होता. श्रेयांसला एके

रात्री दिसलेल्या स्वप्नांचे फळ तो बंधूला विचारतो तेव्हा महान सत्पुरूष घरी असे सांगितले. आदिनाथ भगवंतांना पाहताच श्रेयांसला पूर्व जन्मीचे स्मरण झाले त्यावेळी भगवंत वज्रजंघ होते व श्रेयांस त्यांची श्रीमती राणी होती. पूर्व भवात दोघांनी चारणऋध्दीधारी मुनींना आहारदान दिले होते. त्यांचे स्मरण झाले त्याप्रमाणे मन, वचन, कायेने, भक्तीने नम्र होऊ न रसाचा निरंतराय आहार ऋषभदेवांना दिला. यावरून पुराणात पुर्नजन्माच्या कथा येतात हे स्पष्ट होते. जैन धर्माचा पुर्नजन्मावर विश्वास आहे. जन्म, मरण हे सातत्याने चक्र चालू असते या चक्रातून मुक्त होण्यासाठी भगवंतांनी समवशरणात जी दिव्यध्वनी केली त्यातून मार्ग दाखविण्याचे कार्य आचार्यांनी केले. - (१०)

आहार दान दिले गेल्याने कर्मभूमित दानाची विधी, दानाची प्रवृत्ती निर्माण झालेली दिसते.

ऋषभनाथ हळूहळू अप्रमत अवस्थेत येऊन मोक्ष मंदिराच्या पाय-याप्रमाणे असलेल्या क्षपक श्रेणीवर अरूढ होऊन त्यांनी संपूर्ण मोहनीय कर्माचा नाश केला. ज्ञानावरण, दर्शनावरण, अंतराय या तीन घातिकर्माचा नाश झाला. केवल ज्ञानाची प्राप्ती झाली तो दिवस व फालगुन महिन्यातील कृष्णपक्षातील एकादशीचा होता. वरील वर्णनावरून भारतीय संस्कृतीत मानवाचे अंतिम ध्येय, "मोक्ष" आहे हे स्पष्ट होते.

भगवंतांचा उपदेश ऐकण्यासाठी इंद्रांनी समवशरणाची रचना केली, समवशरणाची रचना म्हणजे तत्कालीन वास्तू कलेचा एक उत्तम नमूना होय. समवशरणात बारा सभा त्यात गणधर, मुनीगण, कल्पवाशी, देवांगना, आर्यिका स्त्रिया, ज्योतिर्देवांगना, व्यतरदेवीगन, भवनवासी, मनुष्य, पशु बसले होते.

यारून देवांना, स्त्रियांना, मनुष्य, प्राण्यांना उपदेश ऐकण्याची परवाणगी होती. सर्व जीव समान मानने हा जैन सिध्दांत येथे दिसतो.

## समवशरणात भगंवतांनी दिलेला उपदेश -

ऋषभदेवांनी लोकांना असा उपदेश केला की, हे विश्व अनादी अनंत आहे, याला ना आरंभ ना अंत हे कायम असेच चालू राहणार सहा द्रव्यांनी बनवलेले आहे. हे सहा द्रव्य अनादि आहे, त्यांना उत्पन्न करणारा, नाश करणारा कोणीही नाही, ही सहा द्रव्ये म्हणजे जीव, पुद्‌गल, धर्म, अधर्म, आकाश व काल अशी आहेत.

१) **जीव** - ज्यात चेतना आहे, जे ज्ञानदर्शनाने युक्त आहे.

२) **पुद्‌गल** - स्पर्श, गंध, रस, वर्ण हे गुण ज्यात असतात त्या द्रव्याला पुद्‌गल म्हणतात. पुद्‌गल दोन प्रकारचे आहेत १) अणु व २) स्कंध , स्कंध परमाणू अत्यंत सुक्ष्म असतो, दोन किंवा अधिक परमाणु एकत्र आले की, स्कंध तयार होतो, परमाणु हा पुद्‌गलाचा अखेरचा घटक होय. त्या सुक्ष्म

परमाणुतही स्पर्शादि चार गुण असतात. परमाणुचा पुन्हा भेद होत नाही. ऊन, सावली, मेघ हे पौदगुलीक आहेत.

३) **धर्मद्रव्य** - जगातील पदार्थ मात्रांना, जीवांना, हलनचलन करण्यास साहय करणा-या द्रव्याला धर्म द्रव्य म्हणतात.

४) **अधर्म द्रव्य** - जे द्रव्य जीव, पुद्गलांना स्थिर राहण्यास कारणीभूत असतात, त्याला अधर्म द्रव्य म्हणतात.

५) **आकाश द्रव्य** - थांबू इच्छिणा-या वाटसरूला वृक्षाची छाया जशी साहय करते तसेच अधर्म द्रव्य गतिमान झालेल्या जीव पुद्गलांना थांबण्यास मदत करते. जीवादि सर्व द्रव्यांना राहण्यास स्थान देणा-या द्रव्याला आकाश म्हणतात.

आकाशाच्या जेवढया विभागात जीवादि द्रव्य राहतात त्याला आकाश म्हणतात. आकाशातील बाहेरील भागास लोकाकाश म्हणतात.

६) **कालद्रव्य** - वस्तुमात्रातील परिवर्तनाला कारण होणा-या द्रव्याला काल म्हणतात. प्रत्येक द्रव्य उत्पादक, ध्येय व ध्रोव्यात्मक असल्यामुळे प्रत्येक समयाला त्याच्यात उत्पत्ती, स्थिती आणि विलय चालूच असतात. पदार्थाची या समयाची अवस्था दुस-या समयात रहात नाही.

भव्य जीवांना हिंसाच दु:खाला कारण आहे. अहिंसा हिच सर्व सुखाला कारण आहे. ख-या सुखाची इच्छा करीत असाल तर अहिंसक बना. अहिंसक बनन्यासाठी संतोषी व्हा, जो संतोषी आहे तोच मुमुक्षू आहे आणि



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

जो असंतोषी आहे तो बुभुक्षू आहे. परीग्रहाच्या जाळयात गुरफटला तर मरणानंतर नरकात पडावे लागेल.

सहाही द्रव्यात जीवच हा ज्ञाता द्रष्टा आहे म्हणून स्वतःला अर्थात आत्म्याला जो जाणतो, समजतो तोच धर्माला समजू शकतो, आत्माच सर्वश्रेष्ठ आहे. त्याला विकारापासून दूर ठेवा. नरक, तिर्यच, मनुष्य व देव या गतीत भ्रमण करणारे जीव हे संसारी आहेत. सर्व कर्मापासून मुक्त झालेले व कोणत्याच गतीत नसलेले जीव मुक्त आहेत. मुक्त अवस्था म्हणजेच शुध्द अवस्था, म्हणजेच मोक्ष होय.

भगवंताचा उपदेश ऐकुण अनेकांनी दिक्षा घेतली, ऋषभनाथांची मुलगी ब्राम्ही हिनेही दिक्षा घेतली तसेच सुंदरीने संसारातून विरक्त होऊन दिक्षा घेतली.

ॠषभनाथाचे पुत्र सम्राट भरतानेही क्षत्रियांना भगवंतानी दाखविलेल्या मार्गाचे दिग्दर्शन देऊन राजधर्माचा उपदेश केला. भरतानेही जिनदिक्षा घेऊन लवकरच केवल ज्ञान प्राप्त करून घेतले. प्रथम ते सहा खंडाचे सम्राट होते, तर आता त्रिलोकांचे नाथ झाले.

समाजजीवन अर्थात सामाजिक शास्त्रातला संशोधन विषय 'चल' म्हणजे बदलणारा घटक आहे. भाव भावना असलेला, विचार करु शकणारा, कल्पनाशक्ती असलेला असा माणूस किंवा महापुरुष त्यांनी निर्माण केलेल्या समाजव्यवस्था व समाज जीवन हे येथे संशोधन विषय असल्याने अभ्यासक्षेत्रही चल आहे. अवलोकन करणे, अचुकपणे नोंदी घेणे, नेमकेपणाने नोंदी घेणे अवघड असते. फार व्यापक प्रमाणावर विचार करावा लागतो. म्हणूनच संशोधनाच्या ऐतिहासिक वर्णनात्मक, तौलनिक, विकासात्मक अशा सर्व पध्दतीचा येथे उद्दीष्टाप्रमाणे अवलंब करावा लागतो. वस्तुनिष्ठा सांभाळणे अवघड होते म्हणून व्यक्तिगत प्रतिक्रिया आवडी -निवडी, मते, ग्रह, पूर्वग्रह इत्यादीचा नकळत प्रवेश संशोधन प्रक्रियेत काही प्रमाणात का होईना, होण्याची शक्यता असते. तो दूर ठेवून हा लघूप्रबंध लिहिण्याचा प्रयत्न केला आहे.

सामाजिक जीवन व त्यातील समस्या एकदेशीय नसतात. अनेकविध -विद्या यांच्याशी त्या एकाच वेळी निगडीत असतात. त्याचे स्वरुप संमीश्र व गुंतागुंतीचे असते. म्हणूनच ते अस्पष्ट, धूसर, अनुमानत्मक असतात. वर्तमान काळात समाजात भेडसावणाऱ्या समस्या व पुराणकाळातील सामाजिक समस्या तुलनात्मक विचार करुन समस्यावर तोडगाही काढता येतो.

सामाजिक क्षेत्रातील संशोधन हे नित्य बदलते, वाढते म्हणून जूने सर्व बाद होत नाही. काही चूकीचे ठरते. नव्या संदर्भात अनुपयुक्त ठरते. पण तेवढयाने जूने सर्व नामशेष होते, असे मात्र नाही. जून्या प्रश्नांची नवी रुपे ध्यानी येतात, त्यातून नवे मार्ग दिसू लागतात.

सामाजिक शास्त्रातील संशोधनाची प्रयोगशाळा प्रत्यक्ष समाज, राष्ट्र व राष्ट्र व्यवहारादी परीवर्तनशील क्षेत्रेही असल्याने त्यासंबधी निर्णयात्मक एकलक्षणी उत्तर संशोधनाच्या हाती लागत नाही. म्हणूनच ही संशोधने वर्णनात्मक, समालोचनात्मक वस्तुस्थितीदर्शक अशीच असतात. निष्कर्षावर फार मोठया मर्यादा पडलेल्या असतात. त्यात लवचिकपणा असतो. कालाशी व स्थलाशी हे संशोधन बांधलेले असते. त्यामुळे त्याचा पडताळा घेता येत नाही. भौतिक शास्त्राच्या संशोधनाचे पुनः परीक्षण करता येते. तसे येथे करणे शक्य नाही. संशोधन पुन्हा केले तरी निष्कर्ष थोडे वेगळेच हाती लागतात. शिवाय संशोधकाच्या व्यक्तिमत्वाला एकाच सामाजिक परिस्थितीचे विश्लेषण दोन समाज संशोधक वेगवेगळे करु शकतात. त्यांच्या अवलोकनात, आकलनात वस्तुनिष्ठतेचा प्रयत्न असला तरी निष्कर्ष घेण्यात व्यक्तिनिष्ठता दिसते.

आदिपुराण ग्रंथातील सामाजीक जीवनाचे चित्र पहात असताना त्या काळातील सामाजिक स्थिती, विवाहसंस्था, वर्णव्यवस्था, आश्रमपध्दती, स्त्रियांचे स्थान, शिक्षणपध्दती, शासन व्यवस्था, न्याय व्यवस्था याचे हि ज्ञान होते. नव्या काळात या सर्व संस्थामध्ये कांही बदल झाला असेल, संदर्भ बदलले असतील तरीही मनुष्य सर्व काळात काही प्रमाणात तरी तसाच वागत होता. हे लक्षात येते आणि त्यामुळे प्राचीन ग्रंथाचा अभ्यास आजहि मार्गदर्शनपर ठरु शकतो.